डॉ. मल्हार कावळे स्मृती प्रित्यर्थ
'आकलन' वैचारिक निबंध स्पर्धा

नमस्कार, मी भाग्यश्री कावळे-बारलिंगे. आज इथे मी आपल्याशी बोलतेय ती माझ्या माहेराची म्हणजे कावळे कुटुंबीयांची प्रतिनिधी म्हणून. माझ्या वडिलांच्या म्हणजे डॉ. मल्हार कावळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ साहित्य क्षेत्रात लिखाणाची स्पर्धा ठेवण्याचे जेव्हा ठरवले तेव्हा पहिली आठवण आली ती आदरणीय विद्याताई बाळ व त्यांचे साहित्यिक व सामाजिक दृष्ट्या परिपूर्ण असे मासिक मिळून साऱ्याजणी- यांची ! हे मासिक, ही चळवळ, त्यामागचा विद्याताईंचा विचार ह्या सगळ्यांचा मागोवा आम्ही दूर वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट या गावी राहून गेली अनेक दशके घेतो आहोत. हे विचारांचं वळण आणि साहित्य धर्म आम्हाला परका नाही कारण गावात वाढलो तरी आमच्या घरात पुणं होतं असं आम्ही अभिमानानं म्हणतो आणि ते केवळ आमच्या चोखंदळ वाचक, कलाप्रेमी, रसिक अश्या आईवडिलांमुळेच ते शक्य झालं याची जाणीव आम्हाला आहे. त्यांनीच आमची विद्याताईंशी अप्रत्यक्ष रित्या ओळख करून दिली ती किस्त्रीम चे अंक हातात देऊन! या क्षणी मी माझ्या बाबांचे व विद्याताईंचे पुण्यस्मरण करते.

एका ग्रामीण भागातले डॉक्टर असले तरी माझ्या बाबांच्या जगण्याचा परिघ बराच विस्तृत होता. त्यांचं पुस्तकवेड, लोक संचय, नाट्यप्रेम तसेच त्यांचा विनोदी स्वभाव, देखणं व्यक्तिमत्व ह्या सर्व गुणांमुळे त्यांच्या भोवती प्रसन्नतेचे वलय असे. समाजाची उन्नती ही स्त्रीच्या प्रगतीशी बांधलेली आहे याची त्यांना खोलवर जाणीव होती. ती त्यांनी कृतीत उतरवली ती अशी की त्यांनी मातृ सेवा संघ या परित्यक्त स्त्रियांना

आधार देणाऱ्या संस्थेसाठी पंचेचाळीस वर्षे निःस्वार्थीपणे honarary डॉक्टर म्हणून काम केले. तसेच आमच्या घरी काम करणाऱ्या मुलींना योग्य शिक्षण मिळून त्यांना नर्सिंग स्कुल मध्ये जाण्यासाठी आर्थिक व सामाजिक आधार दिला. समाजात धडपडणाऱ्या मुलांची एक फळी नेहमीच असते. तिला थोड्याश्या पाठींब्याची, मार्गदर्शनाची गरज असते. बाबांकडे कंपाउंडर म्हणून काम करणारी मुले त्यांच्या उत्तेजनामुळे पुढे शिकली आणि त्यांना उत्तम पगाराच्या नोकऱ्या मिळाल्या हे सांगण्यास विशेष आनंद होतो. समाजकार्य ही मुहूर्त पाहून किंवा साठी उलटल्या नंतर करण्याची गोष्ट आहे हे त्यांना कधीच पटलं नाही तर लोकांना मदत करत राहणं हे त्यांच्या जीवनाचं एक अविभाज्य अंग होतं. आणि म्हणूनच त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित 'आकलन' वैचारिक निबंध स्पर्धेसाठी जे विषय निवडले आहेत ते डॉ. मल्हार कावळे यांच्या विचारसरणीला धरून अगदी नेमके आणि योग्य असे आहेत.

'मिळून साऱ्याजणी' चे शीर्षक विधान असे आहे - 'ती' आणि 'तो' या पलीकडचे सर्व 'ते' यांचा स्वतःशी आणि परस्परांशी नव्यानं संवाद व्हावा यासाठी... हे वाक्यच मुळी सामाजिक उत्क्रांतीचं, सदोदित विस्तारणाऱ्या क्षितिजांचं प्रतीक आहे. ह्या स्पर्धेच्या विचाराला साऱ्याजणीच्या कुशल व समर्थ संपादिका डॉ. गीताली ताई यांनी पाठींबा दिला आणि हा विचार प्रत्यक्षात आणण्यास मदत केली या बद्दल त्यांचे मनापासून आभार.

'मिळून साऱ्याजणी' या प्रगल्भ व विचारप्रेरक मासिकाकडून डॉ. मल्हार कावळे स्मृती प्रित्यर्थ स्पर्धा संपन्न होते आहे, हा आमच्या वडिलांचा गौरव आहे.

निमित्तांची दारं उघडतात अन् आपण भेटतो असं म्हणतात. या स्पर्धेच्या निमित्ताने अप्रत्यक्षपणे का होईना  'मार्गी' या संस्थेची आणि तिच्या

संस्थापक- प्रवीण चव्हाण यांच्याशी ओळख झाली. या संस्थेचं कार्य आजच्या शिक्षणाच्या बाजारू जगात महत्वाचं आहे, गरजेचं आहे आणि धडपडणाऱ्या तरुण पिढीला योग्य मार्गदर्शन करणारं आहे हे मला डॉ. गीताली ताईंकडून तर कळलेच पण या संस्थेच्या facebook पेजवर जे अनेक चांगले reviews आहेत, त्यावरून UPSC आणि MPSC या कठीण परीक्षांमध्ये मार्गी ची किती मदत आली हे कळते. माझ्या वडिलांच्या विचारांचे प्रतिबिंब जसे मी आदरणीय विद्याताईंच्या कार्यात पाहिले तसेच ते आता माननीय, बुद्धिमान आणि उत्तम वक्ते असलेल्या प्रवीण चव्हाण यांच्या कार्यात पाहते आहे. मार्गी या संस्थेचा मिळून साऱ्याजणी बरोबर सहभाग म्हणजे दुग्ध-शर्करा योग्य आहे. डॉ. मल्हार कावळे यांनी या संस्थेची नक्कीच भलावण केली असती, तिला सक्रिय पाठींबा दिला असता. भारताच्या तरुण पिढीचा आत्मविश्वास वाढवणारी अशी ही संस्था सदा प्रगतीपथावर असो ह्या शुभेच्छा ! आणि मार्गीच्या सहभागामुळे तरुण पिढी या वैचारिक निबंध स्पर्धेत जास्तीत जास्त प्रमाणात भाग घेवो हीच इच्छा व अपेक्षा!

मी परत एकदा डॉ. मल्हार कावळे स्मृती प्रित्यर्थ 'आकलन' वैचारिक निबंध स्पर्धा याचे आयोजन केल्याबद्दल मिळून साऱ्याजणीच्या डॉ. गीताली व मार्गीचे श्री. प्रवीण चव्हाण यांचे मनापासून आभार मानते. धन्यवाद !